आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
४ नोव्हेंबर २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- एसआयआरचा म्हणजे मतदार याद्यांच्या विशेष पुनरिक्षण मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठीचा प्रचार आज संध्याकाळी संपणार

- महाराष्ट्रातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर होण्याची शक्यता

**आणि**

- आयसीसी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचं विजेतेपद मिळवणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघावर सर्व थरांतून अभिनंदनाचा वर्षाव

<><><><><>

निवडणूक आयोगाने आजपासून एसआयआरचा म्हणजे मतदार याद्यांच्या विशेष पुनरिक्षण मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू केला. नऊ राज्यं आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिळून एकंदर ५१ कोटी मतदारांची पडताळणी या मोहिमेत केली जाणार आहे. या मतदारांची पडताळणी करून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. यापूर्वी बिहारमध्ये पडताळणी मोहीम आयोजित करण्यात आली होती. त्यात मतदारांच्या पडताळणीनंतर सात कोटी ४२ लाख मतदारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली होती.

दुसऱ्या टप्प्यात छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, मध्य प्रदेश, पुदुच्चेरी, राजस्थान, तमिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, अंदमान आणि निकोबार तसंच लक्षद्वीपमध्ये मतदारांची पडताळणी केली जाणार आहे. यापैकी तमिळनाडू, केरळ, पुदुच्चेरी आणि पश्चिम बंगालमध्ये २०२६मध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. आजपासून ४ डिसेंबरपर्यंत मोजणीचा टप्पा असेल. मतदार याद्यांचा पहिला मसुदा ९ डिसेंबरला प्रसिद्ध केला जाईल आणि ७ फेब्रुवारी २०२६ला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. कोणताही पात्र मतदार निवडणूक प्रक्रियेपासून वंचित राहू नये याची खबरदारी घेणं, तसंच बेकायदा स्थलांतरितांसह अपात्र मतदारांची नावं वगळणं हा या मोहिमेचा उद्देश असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

विद्यार्थ्यांनी शिक्षणाप्रति आस्था ठेवली पाहिजे असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. नैनीतालमधे कुमाऊँ विद्यापीठाच्या विसाव्या दीक्षांत समारंभाला त्या संबोधित करत होत्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी उत्तराखंड दौऱ्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी सकाळी नीम करोली बाबांच्या आश्रमात कैंची धामला भेट दिली तसंच नैनीतालमधे नयना देवी मंदिरात जाऊन पूजा अर्चा केली.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठीच्या प्रचाराची मुदत आज संध्याकाळी संपणार आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

**---व्हीसी---**

*(बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठीच्या प्रचाराचा शेवटचा दिवस असल्यामुळे मतदारांना आकर्षित करण्याची सर्व पक्षांना आज शेवटची संधी आहे. त्यामुळे रालोआ आणि महाआघाडीच्या सर्व वरिष्ठ नेते आणि स्टार प्रचारकांनी प्रचारसभांचा धडाका लावला आहे. दोन्ही बाजूंनी आरोप - प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा आज भोजपूर आणि गयामधे सभा घेणार आहेत. ज्येष्ठ नेते आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह मुंगेर, वैशाली, पाटणा आणि सहरसा जिल्ह्यांमधे प्रचारसभेला संबोधित करतील. तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रचारसभा पूर्व आणि पश्चिम चंपारण तसंच दरभंगा जिल्ह्यात होणार आहेत.*

*काँग्रेसचे ज्येष्ठ नेतेही मतदारांना साद घालण्यासाठी गया आणि औरंगाबाद जिल्ह्यात प्रचारसभा घेणार आहेत. महाआघाडीचे मुख्यमंत्रीपदासाठीचे उमेदवार आणि राजद नेते तेजस्वी यादव समस्तीपूर, बेगुसराय, दरभंगा, मुझफ्फरपूर आणि वैशाली जिल्ह्यांमधे एकूण सतरा सभांना संबोधित करणार आहेत. तर समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव महाआघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी गयामध्ये सभा घेणार आहेत.*

*या टप्प्यात अठरा जिल्ह्यातल्या १२१ मतदारसंघात ६ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.)*

'मेरा बूथ सबसे मजबूत' या उपक्रमांतर्गत भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज बिहारमधील महिलांशी संवाद साधणार आहेत.

**<><><><><>**

भारताचं स्टील उत्पादन २०३० पर्यंत ३० कोटी टन तसंच २०४७ पर्यंत ५० कोटी टन करण्याचं उद्दिष्ट असल्याचं सरकारनं म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज सीआयआय स्टील शिखर परिषदेच्या उद्घाटनपर सत्रात स्टील मंत्रालयाचे सचिव संदीप पुंडरीक यांनी ही माहिती दिली. गेल्या दशकभरात भारताचं स्टील उत्पादन दुपटीने वाढलं आहे, पायाभूत सुविधा आणि देशांतर्गत मागणीही वाढली आहे, असं त्यांनी सांगितलं. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत स्टील उद्योग क्षेत्रानं साडे आठ टक्के वाढ नोंदवल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><>**

तंत्रज्ञान, व्यापार आणि आंतरराष्ट्रीय तणावाची आधीपेक्षा अधिक वेगानं सरमिसळ होण्याचा हा काळ आहे, असं प्रतिपादन नौदल प्रमुख दिनेश कुमार त्रिपाठी यांनी केलं आहे. ते आज दहाव्या भारतीय संरक्षण परिषदेला संबोधित करत होते. या सरमिसळीमुळे धोरणात्मक बदलही वेगानं होत आहेत. या नव्या परिस्थितीत स्वदेशी आणि स्व-क्षमतेला अधिक महत्त्व प्राप्त झालं आहे, असं त्रिपाठी म्हणाले.

**<><><><>**

महात्मा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत आता २३९९ आजारांचा समावेश करण्याला राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. लाभार्थ्याला उपचारासाठी पाच लाखांपर्यंतचा खर्च शासनातर्फे देण्यात येईल. मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेतल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वार्ताहरांना सांगितलं.

**<><><><>**

महाराष्ट्रातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी संदर्भात राज्य निवडणूक आयोग आज पत्रकार परिषद घेणार आहे. मुंबईत आज दुपारी चार वाजता निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे पत्रकार परिषदेला संबोधित करतील. यात स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री जितीन प्रसाद यांनी आज रोमानियाचे मंत्री ओआना सिल्विया सोइयू यांच्याबरोबर बुखारेस्ट इथे द्विपक्षीय बैठक घेतली. भारत आणि युरोपियन महासंघाच्या व्यापाराचा विस्तार, गुंतवणूक तसंच पुरवठा साखळीचं मजबुतीकरण या

मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा झाल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या वर्षभरात भारत आणि युरोपियन महासंघादरम्यान परस्पर हिताचा मुक्त व्यापार करार पूर्ण करण्यासाठी एकत्र काम करण्याबाबत या बैठकीत सहमती झाली. दोन्ही मंत्र्यांनी भारत आणि रोमानियामधला स्थिर व्यापार आणि गुंतवणूक संबंधांचा आढावा घेतला. गेल्या आर्थिक वर्षात भारताकडून रोमानियाला होणारी निर्यात १ अब्ज ३ कोटी डॉलर्सपेक्षा जास्त झाल्याचंही मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

इस्रायलने हमासच्या २०० दहशतवाद्यांना राफा भागातून गाझा पट्टीच्या दिशेने सुरक्षितपणे जाऊ दिलं जाणार नसल्याचं म्हटलं आहे. इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांच्या कार्यालयाने हे स्पष्टीकरण दिलं आहे. इस्रायल दहशतवादाचा बिमोड करत असून हमास आणि गाझा पट्टीचं निःशस्त्रीकरण करण्याची आपली भूमिका नेतान्याहू यांनी स्पष्ट केली आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत सरकारी कामकाज ठप्प झाल्याने हजारो विमान उड्डाणं उशिराने होत आहेत. त्यामुळे अमेरिकेच्या विमानतळांवरची हवाई वाहतूक विस्कळीत झाली आहे. फेडरल सरकारचं कामकाज गेल्या महिन्याभरापासून बंद झाल्याने त्याचा परिणाम हवाई वाहतुकीवर होत आहे.

**<><><><><>**

कतारमधे दुसऱ्या जागतिक सामाजिक विकास शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी केंद्रीय कामगार, रोजगार मंत्री तसंच क्रीडा आणि युवा व्यवहार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय आज दोहा इथे पोहोचले. या परिषदेच्या उद्घाटन सत्राला ते संबोधित करतील. या बैठकीत ते भारताच्या समावेशक आणि सक्षम डिजिटल विकासाच्या धोरणाविषयी माहिती देतील. शिखर परिषदेव्यतिरिक्त, डॉ. मांडवीय कतार, रोमानिया, मॉरिशस आणि युरोपियन महासंघातल्या समकक्ष अधिकाऱ्यांबरोबर बैठका घेणार आहेत.

**<><><><><>**

आयसीसी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचं विजेतेपद मिळवणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघावर सर्व थरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र

मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाचं अभिनंदन केलं आहे. या विश्वविजेत्या संघाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं ५१ कोटी रुपयांचं रोख पारितोषिक जाहीर केलं आहे.

भारतीय महिला संघातल्या खेळाडूंच्या प्रतिभेला आणि कामगिरीला साजेसा हा विजय आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. महिला संघानं संपूर्ण स्पर्धेत आपली सांघिक कामगिरी आणि दृढनिश्चय दाखवत हा ऐतिहासिक विजय मिळवल्याची भावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही या संघाचं अभिनंदन केलं आहे. या संघाच्या विजयात योगदान देणाऱ्या महाराष्ट्राच्या खेळाडू स्मृती मानधाना, जेमिमा रॉड्रीग्ज आणि राधा यादव या तिघींचा रोख पुरस्कार देऊन सन्मान करायचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

**<><><><><>**

फिडे बुद्धिबळ विश्वचषक  स्पर्धेत भारताचे ग्रँडमास्टर नारायणन एस एल, दीप्तायन घोष यांच्यासह आरण्यक घोष यांनी दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. गोव्यात पणजी इथं सुरू असलेल्या या स्पर्धेतून विश्वनाथन आनंद चषकासाठी पन्नास खेळाडूंची निवड होणार आहे. यापूर्वी सहा भारतीय खेळाडूंनी दुसऱ्या फेरीत स्थान मिळवलं आहे. ८२ देशांमधल्या २०६ खेळाडूंनी या स्पर्धेत भाग घेतला आहे.

**<><><><><>**

**आंध्र प्रदेशच्या** अल्लुरी सीताराम राजू जिल्ह्यात आज सकाळी ३ पूर्णांक ७ दशांश रिश्टर तीव्रतेचा भूकंप झाला. या भूकंपाचे धक्के विशाखापट्टणम जिल्ह्यातही जाणवले. **कर्नाटकातल्या** विजयपूर जिल्ह्यातही आज सकाळी २ पूर्णांक ९ दशांश रिश्टर तीव्रतेचा भूकंप जाणवला. या दोन्ही भूकंपाची तीव्रता कमी असल्यामुळे कोणत्याही प्रकारच्या नुकसानीची माहिती मिळालेली नाही.

**//<><><><><>//**